MHAH250026082025

## निशाणी क्र. १ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी वारसाहक्क प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ व ३ यांची जनक आई असुन अर्जदार नं.१ चे पती, अर्जदार नं.२ व ३ चे वडील भाऊसाहेब मारुती पडवळे हे दिनांक ०९/१०/१९९० रोजी मौजे गांजीभोयरे, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे मयत झालेले आहेत. मयत भाऊसाहेब यांचे मृत्युपुर्वी त्यांचे हयातीत ते बॉम्बे मेट्रोपोलीशन ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लि. मध्ये चालक या पदावर काम करीत होते. त्यांचा चालक परवाना क्र.२८७ असा नोंदविला गेलेला होता. १९८४ साली सिडको द्वारे बी.एम.टी.सी. नामक परिवहन बस सेवा सुरु करण्यात आली होती. पुढे अल्पावधीत ती बंद करण्यात आली तेंव्हा तेथील कर्मचा–यांवर उपासमारीची वेळ आली होती. तेंव्हा त्या १००० पेक्षा जास्त कामगारांना मोबदला मिळवुन देण्यासाठी अनेक प्रयत्न झाले व अखेर ६३१ कर्मचा–यांची यादी प्रसिध्द झालेली असुन मयत भाऊसाहेब मारुती पडवळे यांचे नांव अ.नं.१६७ ला नोंदविलेले आहे. तेंव्हा त्या संदर्भात सदरच्या सिडको भवन सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई ४००६१४ यांचे ऑफिस दप्तरी अर्जदार यांनी दिनांक १७/१०/२०२५ चौकशी केली असता त्यांनी मयत भाऊसाहेब मारुती पडवळे यांच्या पश्चात असणा–या वारस प्रमाणपत्राची तोंडी मागणी केली. त्यामुळे अर्जदार नं.१ ते ३ हेच मयत भाऊसाहेब मारुती पडवळे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. सदरील अर्जानुसार दैनिक प्रभात मध्ये जाहिर प्रगटन दि.०३.१२.२०२५ रोजी छापण्यात आले परंतु सदर अर्जास कोणीही हजर राहुन आक्षेप घेतला नाही.

४. अर्जदारांनी अर्जातील कथनाच्या पृष्टयर्थ अर्जदार क्र.२ व ३ यांचे शपथपत्र (नि.११ व १२) दाखल केलेले आहे. याउपर अर्जदारांनी मयत भाऊसाहेब पडवळे यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची तसेच अर्जदाराच्या आधार कार्डाच्या व्हेरिफाईड प्रती दाखल केल्या

आहेत. तसेच निशाणी क्र.८ वर दैनिक प्रभात, अहमदनगर आवृत्ती मध्ये प्रसिद्ध झालेली जाहीर नोटीस दाखल केली आहे. जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही मुदतीत अगर या आदेशा पावेतो कोणीही आजपर्यंत अर्जास हरकत नोंदवलेली नाही. मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता भाऊसाहेब मारुती पडवळे यांच्या मृत्यु दिनांक ०९/१०/१९९० रोजी झाल्याचे दिसुन येते. अर्जदारांच्या आधार कार्डाचे व शपथपत्राचे अवलोकन केले असता त्यांच्या शिवाय मयत भाऊसाहेब मारुती पडवळे यांना इतर कोणीही वारस नसल्याचे दिसुन येते. उपलब्ध पुराव्याच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे ते वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. परिणामी वारसाहक्क प्रमाणपत्र अर्जदार यांच्या लाभात देणे न्यायोचीत होणार आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. मयत भाऊसाहेब मारुती पडवळे यांचे अर्जदार नं.१ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत व त्यांना वारसाहक्क प्रमाणपत्र (Heirship Certificate) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

KANAKDANDE SHRIHARI
Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.03.11 17:57:24 +0530

दिनांक:–११.०३.२०२६

( एस.आर.कनकदंडे )

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर.)**

**पारनेर.**